भारतीय रिज़र्व बैंक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/१६८**
**डीबीओडी क्र. एलइजी. बीसी. ३७ /०९.०७.००५/२०१२-१३** **ऑगस्ट १६, २०१२**

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(आरआरबी सोडून)

महोदय**,**

**दोन्हीपैकी एक किंवा जीवित व्यक्ती किंवा आधीची व्यक्ती किंवा जीवित व्यक्ती मॅंडेट असलेल्या मुदत/स्थिर ठेवींचे मुदतपूर्व पुनरप्रदान - स्पष्टीकरण**

कृपया आमचे परिपत्रक डीबीओडी.क्र.एलईजी.बीसी ४६/०९.०७.००५/२०११-१२ दि. नोव्हेंबर ४, २०११ च्या परिच्छेद ४ चा संदर्भ घ्यावा. ह्यात आम्ही सांगितले होते की, वरीलप्रमाणे आयदर ऑर सर्व्हायव्हर किंवा फॉर्मर ऑर सर्व्हायव्हर मॅंडेट असलेल्या मुदत/स्थिर ठेवींच्या संयुक्त ठेवीदारांनी, दुस-या ठेवीदाराचे निधन झाल्यावर, त्या ठेवींची मुदतपूर्व निकासी करण्यास परवानगी दिल्यास, बॅंका तसे करु देण्यास मुक्त आहेत. मात्र, अशा वेळी बॅंकांनी तसे करण्यासाठी ठेवीदारांकडून संयुक्त मॅंडेट घ्यावे. ह्याबाबत, आमचे परिपत्रक डीबीओडी.क्र.एलईजी.बीसी.९५/०९.०७.००५/२००४-०५ दि. जून ९, २००५ च्या परिच्छेद ३ चा संदर्भ घ्यावा. त्यानुसार, बॅंकांना सांगण्यात आले होते की त्यांनी, खाते उघडण्याच्या फॉर्ममध्येच, ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास, त्या ठेवींची मुदतपूर्व निकासी ही केवळ त्यांनी विहित केलेल्या अटींवरच करण्यास परवानगी असेल असे कलम टाकण्यात यावे. वरील बाबीस भरपूर प्रसिध्दी देऊन ह्याबाबत ठेवीदारांनाही मार्गदर्शन करण्यास बॅंकांना सांगण्यात आले होते.

(२) येथे पुनश्च सांगण्यात येत आहे की, ‘आयदर ऑर सर्व्हायव्हर’ किंवा ‘फॉर्मर ऑर सर्व्हायव्हर’ मॅंडेट असलेल्या मुदत ठेवींच्या बाबतीत, केवळ संयुक्त ठेवीदारांकडून तशा प्रकारचे संयुक्त मॅंडेट मिळाले असल्यासच, एका ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास, जीवित ठेवीदाराला, त्या ठेवीची मुदतपूर्व निकासी करण्यास बॅंकांनी परवानगी द्यावी.

(३) आमच्या असे नजरेस आले आहे की, काही बॅंकांनी असे कलम खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये समाविष्ट केला नाही आणि अशा मॅंडेटची सुविधा उपलब्ध असल्याची त्याच्या ग्राहकांना जाणीवही करुन दिली नाही व त्यामुळे जीवित ठेवीखातेदार अकारण अडचणीत येतात. ह्यासाठी बॅंकांना सांगण्यात येते की, त्यांनी त्यांच्या खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये वरील कलम न चुकता घालावे आणि विद्यमान तसेच भावी ठेव-ग्राहकांनाही असा पर्याय असल्याचे कळवावे.

(४) संयुक्त ठेवीदारांना, स्थिर ठेव ठेवतांनाच किंवा त्या ठेवीच्या मुदतीत केव्हाही असे मॅंडेट देण्याची परवानगी असावी. असे मॅंडेट मिळाल्यास, मृत झालेल्या संयुक्त ठेवीदाराच्या कायदेशीर वारसांच्या सहअनुमतीशिवायही, बॅंका, जीवित ठेवीदाराला त्या ठेवीची मुदतपूर्व निकासी करण्यास परवानगी देऊ शकतात. येथे पुनश्च सांगण्यात येते की अशा मुदतपूर्व निकासीसाठी कोणतेही दंडात्मक आकार लागु नाहीत.

(५) ह्या पत्रकात दिलेले स्पष्टीकरण, परिपत्रक डीबीओडी.क्र. एलईजी.९५/०९.०७.००५/२००४-०५ दि. जून ९, २००५ चा परिच्छेद ३ रद्दबातल ठरविते.

आपला विश्वासु

(राजेश वर्मा)
मुख्य महाव्यवस्थापक